पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. पोउपआ/वावि/वाहतुक अधिसुचना/ ९६६ /२०२३ दि. १०/१०/२०२३

**–: वाहतूक नियंत्रण अधिसुचना :–**

**ज्याअर्थी,** डोंबिवली वाहतूक उप विभागाचे हद्दीत दि. १५/१०/२०२३ ते दि. २४/१०/२०२३ या कालावधीत नवरात्रौत्सव व दसरा सणानिमित्त डोंबिवली पूर्व परिसरातील शिवसेना पक्ष तर्फे कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या नांदिवली रोडवर डी. एन. सी. शाळेचे मैदानात दि. १४/१०/२०२३ रोजी रात्रौ २४:०० वाजेपासून दि. २४/१०/२०२३ रोजी रात्रौ २४:०० वाजेपावेतो **'डोंबिवली रासरंग गरबा'** आयोजित करण्यात आला आहे. सदर कार्यक्रमात मोठे सिनेकलाकार, अति महत्वाच्या व्यक्ती येणार आहेत. तसेच गरबा नाचण्याकरीता मोठया संख्येने युवक सहभागी होणार आहेत. सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी, डॉ. विनयकुमार मे. राठोड, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१)(अ)(ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसुचना जारी करीत आहे. :–

**प्रवेश बंद –** १) नांदिवली रोडने दत्तनगर चौक कडे येणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **छत्रपती शिवाजी महाराज चौक/एकतानगर चौक** येथे 'प्रवेश बंद' करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदर वाहने छत्रपती शिवाजी महाराज चौक/एकतानगर चौक येथून उजवे वळण घेवून संगीतावाडी अथवा पांडुरंगवाडी मार्गे इच्छीत स्थळी जातील.

सदरची अधिसुचना नवरात्रौत्सव व दसरा सणाचे कालावधीत म्हणजेच दि. १४/१०/२०२३ रोजी रात्रौ २४:०० वाजेपासून दि. २४/१०/२०२३ रोजी रात्रौ २४:०० वाजेपावेतो अंमलात राहील.

सदरची वाहतूक नियंत्रण अधिसुचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

( डॉ. विनयकुमार मे. राठोड )
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.
२/– सदरची अधिसुचनेस प्रसिध्दी देणेस विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सविनय सादर,**

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. जिल्हाधिकारी, ठाणे
मा. आयुक्त, कल्याण–डोंबिवली महानगरपालिका.
मा. अपर पोलीस आयुक्त, पुर्व प्रादेशिक विभाग,कल्याण.
प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे, कल्याण
पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–३, कल्याण.
पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा, ठाणे.
परिवहन व्यवस्थापक, कल्याण–डोंबिवली महानगरपालीका, कल्याण
विभाग नियंत्रण कक्ष, राज्य परिवहन विभाग, ठाणे/कल्याण
नियंत्रण कक्ष, ठाणे/कल्याण शहर
ठाणे पोलीस पत्रक.

CamScanner

**प्रत** :– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे शाखा, ठाणे शहर.

२/– सदरची अधिसुचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्द होणेस विनंती आहे.

**प्रत** :– समन्वय अधिकारी, ९ ए.एस.कक्ष, ठाणे.

२/– सदरची अधिसुचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

**प्रत** :– स.पो.आ. कल्याण वाहतूक विभाग, पोनि कोळशेवाडी, कल्याण, डोंबिवली, वाहतूक उपविभाग.

२/– म.न.पा.कल्याण–डोंबिवली च्या संबंधीत अधिका–यांकडून आवश्यक सुचना फलके लावून घ्यावीत.

**प्रत** :– सर्व संबंधीत वाहतूकदार संघटना.

CamScanner